# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

:: प्रधान कार्यालय ::
" मुंबै बँक भवन", २०७, डॉ.दादाभाई नौरोजी रोड,
फोर्ट , मुंबई ४०० ००१, दूरध्वनी – २२६१७१ ५४ ते ५९

# तात्पुरती अधिकर्ष कर्ज सुविधा / धोरण

## Temporary Over Draft Policy (TOD)

Z:\Vaishu\Karj Dhoran 2026\Date 01.01.2026\Individual\Covering.Doc

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित

## वैयक्तिक खातेदार व सहकारी संस्थांसाठी ''तात्पुरती अधिकर्ष कर्ज सुविधा'' (TOD) कर्ज धोरण

**दिनांक ०१/०१/२०२६ पर्यंत अद्यावत बदलासह.**
दिनांक १४/१०/२०१६ मा.संचालक मंडळ सभा,
दिनांक २७/०७/२०२२ मा.संचालक मंडळ सभा, ठराव क्रमांक २३

बँकेच्या ''तात्पुरती अधिकर्ष कर्ज सुविधा'' या कर्ज धोरणाच्या उद्देशानुसार वैयक्तिक चालू खाते / बचत खाते असलेल्या खातेदार यांचे तसेच मजूर, महिला व औद्योगिक, बेरोजगार / सेवा / नाविन्यपूर्ण व इतर अनुषंगिक सहकारी संस्थांच्या समाशोधनाद्वारे होणाऱ्या व्यवहारासाठी (संस्थांच्या खात्यावर नावे पडलेले धनादेश पास करण्यासाठी तसेच सहकारी संस्थांच्या कंत्राटी कामगारांची वेतन बँकेच्या आर.टी.जी.एस/ एन.ई.एफ.टी सुविधेद्वारे देण्यासाठी ) तात्पुरती अधिकर्ष कर्ज सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.

**कर्जाचा उद्देश :-** वैयक्तिक चालू खाते / बचत खाते असलेल्या खातेदार यांचे तसेच मजूर, महिला व औद्योगिक, बेरोजगार / सेवा / नाविण्यपूर्ण व इतर अनुषंगीक सहकारी संस्थांच्या समाशोधनाद्वारे होणाऱ्या व्यवहारासाठीच (वैयक्तिक तसेच सहकारी संस्थांच्या खात्यावर नावे पडलेले धनादेश पास करण्यासाठी तसेच सहकारी संस्थांच्या कंत्राटी कामगारांची वेतन बँकेच्या आर.टी.जी.एस/ एन.ई.एफ.टी सुविधेद्वारे देण्यासाठी ) तात्पुरती अधिकर्ष सुविधा उपलब्ध करण्यात येईल.
**(मा.संचालक मंडळ सभा दि.०३/११/२०२३ ठराव क्रमांक १७ अन्वये )**

**अ) वैयक्तिक चालू खातेदार व वैयक्तिक बचत खातेदार यांचेसाठी पात्रता / निकष :-**

i) बँकेच्या शाखेमध्ये खातेदार यांचे चालू / बचत खाते मागिल तिन वर्षापासून चालू स्थितीत असणे आवश्यक राहील.

ii) सदर खातेदारास बँकेचे नाममात्र सभासदत्व घेण्यासाठी बँकेच्या विहित नमुन्यातील अर्ज व नाममात्र सभासद फी ची रक्कम शाखेत भरणा करावी लागेल.

**शाखेत कर्ज मागणी अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :**

i) कर्ज मागणी अर्ज

ii) वैयक्तिक चालू / वैयक्तिक बचत खातेदाराची अद्यावत के.वाय.सी. डॉक्युमेट्स व एक फोटो.

ii) वैयक्तिक चालू / वैयक्तिक बचत खात्याचे बँक स्टेटमेंट / पासबूक झेरॉक्स प्रत (मागील ६ महिने नोंदीचे)

**कर्ज मर्यादा :-** वैयक्तिक चालू / बचत खात्यावरील मागील सहा महिने कालावधीतील उलाढालीच्या (Turn Over) एकूण रक्कमेच्या १० टक्के किंवा जास्तीत जास्त रु.२५,०००/- (अक्षरी रु.पंचवीस हजार मात्र) यापैकी जी कमी असेल ती रक्कम मंजूर करण्यात येईल.

**कर्ज कालावधी :-** ३० दिवसाकरीता

**कर्ज व्याजदर :-** बँकेच्या मा.संचालक मंडळ सभेतील ठरावामध्ये मंजूर करण्यात येणारा व्याजदर लागू राहील.

**कर्ज उचल :-** वैयक्तिक चालू / वैयक्तिक बचत खातेदाराच्या संबंधित खात्यावर समाशोधनाद्वारे होणाऱ्या व्यवहारासाठीच मंजूर रक्कमेची उचल देण्यात येईल.

**कर्ज उचलीची कागदपत्रे :-** (कर्ज मागणी अर्जासोबत सादर करावीत.)

i) कर्ज करारनामा

ii) प्रॉमिसरी नोट

iii) डेबीट ॲथोरिटी

**कर्ज मंजूरीचे कर्ज व उचलीचे अधिकार :-**

मा.संचालक मंडळ सभेच्या ठरावान्वये शाखा व्यवस्थापक यांना देण्यात आलेले आहेत.

**अटी व शर्ती :-**

१) तात्पूर्ती अधिकर्ष कर्ज सुविधा ही समाशोधनाद्वारे होणाऱ्या व्यवहारांसाठीच वरील प्रमाणे ठरवून दिलेल्या मर्यादेनुसार आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर वैयक्तिक चालू / बचत खातेदार यांना एका वेळी एकाच खात्यावर देण्यात यावी.

२) नाममात्र सभासद असलेल्या व्यक्तीगत बचत / चालू खातेदाराने एका खात्यावर तात्पुरते अधिकर्ष कर्ज उचल घेतल्यास सदर कर्जाची व्याजासह संपूर्ण परतफेड झाल्याशिवाय त्याच व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीगत खात्यावर अथवा सदर व्यक्तीचे नाव असलेल्या इतर संयुक्त खात्यावर तात्पुरते अधिकर्ष कर्ज मंजूर करता येणार नाही.

३) तात्पुरती अधिकर्ष कर्ज मर्यादा शाखास्तरावर मंजुर करण्याचे अधिकार शाखा व्यवस्थापकांना देण्यात आले असल्याने, शाखा व्यवस्थापकाने मंजुर केलेले तात्पुरते अधिकर्ष ३० दिवसात कर्ज व्याजासह वसुल करण्याची जबाबदारी संबंधीत शाखा व्यवस्थापकाची राहिल.

४) कर्जदाराने बँक कर्जाची विहीत वेळेते परतफेड केली नाही तर थकीत रक्कमेवर २% प्रमाणे थकीत तारखेपासून दंडव्याज आकारण्यात येईल.

५) कर्जदाराने अंतिम मुदतीअंती बँक कर्जाची परतफेड न केल्यास कर्जदाराच्या कोणत्याही प्रकारच्या खात्यास नावे टाकून रक्कम वसूल करुन घेण्याचा अधिकार बँकेस राहील.

६) बँक कर्ज मंजूरी पत्रामध्ये आवश्यकतेनुसार जादा अटी/ शर्ती समाविष्ट करण्याचा शाखा व्यवस्थापक यांना अधिकार राहील.

७) वरील पैकी कोणत्याही अटी / शर्तीमध्ये बदल / सुधारणा करण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार बँकेस राहील.

**ब) बँकेच्या मजूर सहकारी संस्था, महिला व औद्योगिक सहकारी संस्था, बेरोजगार / सेवा नाविण्यपूर्ण व इतर अनुषंगिक सहकारी संस्थासाठी पात्रता / निकष पुढील प्रमाणे :-**

i) बँकेच्या कार्यक्षेत्रामध्ये नोंदणीकृत झालेली व बँकेची सभासद असलेली संस्था कर्ज मंजूरीस पात्र राहील.

ii) संस्थेच्या सर्व मा.पदाधिकारी / मा.संचालक मंडळ सदस्यांना बँकेचे नाममात्र सभासदत्व घेण्यासाठी बँकेच्या विहीत नमुन्यातील अर्ज व नाममात्र सभासदत्व फी ची रक्कम शाखेत कर्ज उचल प्रस्तावासोबत भरणा करावी लागेल.

iii) संस्थेस शासकीय / निमशासकीय आस्थापनाकडून मिळालेल्या कामाच्या वर्क ऑडर्स व संस्थेकडे ९० दिवसांच्या कालावधीत प्राप्त होणारी येणेबिले उपलब्ध असल्यास कर्ज मागणी अर्जासोबत सादर करावी लागतील.

**(मा.संचालक मंडळ सभा दि.०३/११/२०२३ ठराव क्रमांक १७ अन्वये )**

**शाखेत कर्ज मागणी / अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-**

i) कर्ज मागणी अर्ज (बँकेच्या विहीत नमून्यातील )

ii) संस्थेचा ठराव व पत्र

iii) नाममात्र सभासदत्व घेण्यासाठी बँकेच्या विहीत नमुन्यातील अर्ज व नाममात्र सभासद फी पोटी जमा करावयाचा धनादेश.

**कर्ज मर्यादा :-**

**अ) मजूर सहकारी संस्था तसेच बेरोजगार/ सेवा / नाविन्यपूर्ण व इतर अनुषंगीक सहकारी संस्थासाठी :-**

संस्थेच्या चालू खात्यावरील मागील महिन्याच्या उलाढालीच्या / व्यवहाराच्या (Turn Over) एकूण रक्कमेच्या २० टक्के किंवा जास्तीत जास्त रु.२,००,०००/- (अक्षरी रु.दोन लाख मात्र) यापैकी जी कमी असेल ती रक्कम. **(मा.संचालक मंडळ सभा दि.०३/११/२०२३ ठराव क्रमांक १७ अन्वये )**

**ब) उर्वरित इतर सभासद सहकारी संस्थांसाठीः-**

संस्थेच्या चालू खात्यावरील मागिल महिन्याच्या उलाढालीच्या / व्यवहाराच्या (Turn Over) एकूण रक्कमेच्या १० टक्के किंवा जास्तीत जास्त रु.५०,०००/- (अक्षरी रु.पन्नास हजार मात्र) यापैकी जी कमी असेल ती रक्कम.

**क) महिला व औद्योगिक सहकारी संस्थांसाठी :-**

संस्थेच्या चालू खात्यावरील मागिल ५ आर्थिक वर्षामध्ये पाच पैकी एका वर्षाच्या जास्तीत जास्त उलाढालीच्या ७५% किंवा जास्तीत जास्त रु.२,००,०००/- (रु.दोन लाख मात्र ) यापैकी जी कमी असेल ती रक्कम.

**कर्ज कालावधी :-**

अ) मजूर सहकारी संस्थासाठी :- ९० दिवसाकरीता.

ब) बेरोजगार / सेवा नाविन्यपूर्ण व इतर अनुषंगिक सहकार संस्थांसाठी :- ९० दिवसाकरीता.

क) महिला व औद्योगिक सहकारी संस्थांसाठी :- ९० दिवसाकरीता.

**(मा.संचालक मंडळ सभा दि.०३/११/२०२३ ठराव क्रमांक १७ अन्वये )**

(१५२)



**कर्ज व्याजदर :-** बँकेच्या मा.संचालक मंडळ सभेतील ठरान्वये मंजूर करण्यात येणारा व्याजदर लागू राहील.

**कर्ज उचल :-** सहकारी संस्थांच्या खात्यावर समाशोधनाद्वारे होणाऱ्या व्यवहारासाठी कंत्राटी कामगारांचे वेतन बँकेच्या आर.टी.जी.एस/एन.ई.एफ.टी. सुविधेद्वारे देण्यासाठी) मंजूर रक्कमेची उचल देण्यात येईल. मात्र सहकारी संस्थांना कंत्राटी कामगारांना द्यावे लागणारे वेतन बँकेच्या आर.टी.जी.एस/ एन.ई.एफ.टी सुविधेद्वारे अदा करणेपूर्वी संस्थेने कर्ज उचलीच्या वेळी संस्थेच्या कंत्राटी कामगारांची अधिकृत यादी सादर करावी.

**(मा.संचालक मंडळ सभा दि.०३/११/२०२३ ठराव क्रमांक १७ अन्वये )**

**कर्ज उचलीची कागदपत्रे :-**

i) कर्ज करारनामा

ii) सर्व संचालक मंडळ सदस्यांची के.वाय.सी. कागदपत्रे

iii) ज्वाईट ॲन्ड सेव्हरली लायबिलिटी बॉन्ड

iv) वचन चिठ्ठी (प्रॉमिसरी नोट)

V) डेबीट ॲथोरिटी लेटर

**कर्ज मंजूरीचे व उचलीचे अधिकार :-**

मा.संचालक मंडळ सभेच्या ठरावान्वये शाखा व्यवस्थापक यांना देण्यात आलेले आहेत.

**अटी व शर्ती :-**

१) तात्पूर्ती अधिकर्ष कर्ज सुविधा ही समाशोधनाद्वारे होणाऱ्या व्यवहारांसाठी तसेच सहकारी संस्थांना कंत्राटी कामगारांना द्यावे लागणारे वेतन बँकेच्या आर.टी.जी.एस/ एन.ई.एफ.टी सुविधेद्वारे अदा करणेपूर्वी संस्थेने कर्ज उचलीच्या वेळी संस्थेच्या कंत्राटी कामगारांची अधिकृत यादी सादर करावी. तद्नंतर वरील प्रमाणे ठरवून दिलेल्या मर्यादेनुसार आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर सभासद सहकारी संस्था यांना एका वेळी एकाच खात्यावर देण्यात यावी.

**(मा.संचालक मंडळ सभा दि.०३/११/२०२३ ठराव क्रमांक १७ अन्वये )**

२) तात्पुरती अधिकर्ष कर्ज मर्यादा शाखास्तरावर मंजुर करण्याचे अधिकार शाखा व्यवस्थापकांना देण्यात आले असल्याने, शाखा व्यवस्थापकाने मंजुर केलेले तात्पुरते अधिकर्ष ३०/९० दिवसात कर्ज व्याजासह वसुल करण्याची जबाबदारी संबंधीत शाखा व्यवस्थापकाची राहिल.

३) कर्जदार सहकारी संस्थेने बँक कर्जाची विहीत वेळेत परतफेड केली नाही तर थकीत रक्कमेवर २% प्रमाणे थकीत तारखेपासून दंडव्याज आकारण्यात येईल.

४) कर्जदाराने अंतिम मुदतीअंती बँक कर्जाची परतफेड न केल्यास कर्जदाराच्या कोणत्याही प्रकारच्या खात्यास रक्कम नावे टाकून वसूल करुन घेण्याचा अधिकार बँकेस राहील.

५) बँक कर्ज मंजूरी पत्रामध्ये आवश्यकतेनुसार जादा अटी / शर्ती समाविष्ट करण्याचा अधिकार बँकेस राहील.

६) वरील पैकी कोणत्याही अटी / शर्तीमध्ये बदल / सुधारणा / समाविष्ट करणे किंवा रद्द करण्याचा अधिकार बँकेस राहील.